# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०७/२०२४ (मंगळवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## वाहनासह एकुण ५,०६,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २२/०७/२०२४ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार साईखेडा (म.प्र.) कडुन खुर्सापार गावाकडे एक लाल रंगाचे ट्रॅक्टर मध्ये अवैधरीत्या विनापरवाना गौणखनिज रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशी खात्रीशीर खबर मिळाल्याने मौजा खुर्सापार येथे साईखेडा (म.प्र.) कडुन येणाऱ्या डांबरी रोडवर नाकाबंदी केली असता महिंद्रा ट्रॅक्टर क्र. एम.पी—२८/ए.सी. १८७१ व ट्रॉली क्र. ए.सी २०७२ हे येताना दिसुन आल्याने सदरचे ट्रॅक्टरचे ट्रॉलीची थांबवुन पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून महिंद्रा ट्रॅक्टर क्र. एम.पी—२८/ए.सी. १८७१ व ट्रॉली क्र. ए.सी २०७२ किंमती ५,००,०००/—रू. व त्यामध्ये ०१ ब्रास रेती किंमती ६,०००/—रू. असा एकूण ५,०६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर ट्रॅक्टर ट्रॉली **चालक नामे—१) बंडु माधवराव पटे, वय ४७ वर्ष रा. ढिवर मोहल्ला संगम सावंगा तह. सौसर जि. पांढुर्णा (म. प्र) व २) मालक आरोपी भोजराज गुलाबराव मिरचे रा. संगम सावंगा तह. सौसर जि. पांढुर्णा (म.प्र)** यांचेविरुद्ध कलम ३०३ (२), ४९ भा. न्या. सं सहकलम ४८ (८) जमिन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४/२१ खान खनिज अधिनियम सहकलम—३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधिनियम अन्वये पो.स्टे. केळवद येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद ठाणेदार सपोनि अनिल राउत, पोअं. धोंडुतात्या देवकते यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर